# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग
## आय.एस.ओ.९००१-२००८ युनिट

## परिपत्रक

**विषय :** खरेदी/ विविध सेवा यांची देयके वित्त विभागामध्ये जमा करावयाच्या मुदतीबाबत...

प्राप्त आदेशानुसार सर्व विभागप्रमुख आणि प्रशासकीय शाखाप्रमुख यांना कळविण्यात येते की, आपल्या विभागामार्फत / प्रशासकीय शाखामार्फत निरनिराळया प्रकारचा खर्च केला जातो, यामध्ये समाविष्ट असणा-या सर्व प्रकारच्या खरेदी/ सेवेसंबंधीची देयके कोणत्याही परिस्थितीत खरेदी / संबंधीत सेवा प्राप्त झाल्यापासून जास्तीत जास्त १५ दिवसांच्या आत वित्त व लेखा विभागाच्या केंद्रित / विकेंद्रित वित्तशाखेस सादर करण्यात यावीत. १५ दिवसानंतरची देयके वित्त व लेखा विभागात स्वीकारली जाणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. कोणत्याही कार्यक्रमाचे आयोजन केल्यानंतर किंवा कोणतीही खरेदी केल्यानंतर प्रशासकीय / शैक्षणिक विभागप्रमुखांनी संबंधितांकडून त्वरित खर्चाची देयके मागवून घेवून वरील सूचनेप्रमाणे वित्त व लेखा विभागाकडे पाठविण्यात यावी.

तसेच वित्त विभागाचा जा. क्र. वित्त/२००९-१०/७३८ नुसार यापूर्वी यासंदर्भात निर्गमीत केलेले परिपत्रक क्र. २१५/२००९ दि. ३ जुलै, २००९ रद्द समजण्यात यावे.

जा.क्र. वित्त/२०१५-१६/१४१६
दिनांक : १६ सप्टेंबर, २०१५

सीए (डॉ.) विद्या गारगोटे,
वित्त व लेखा अधिकारी

**प्रत :- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा

} यांना विनंती की, सदरील परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या नजरेस आणावे.

13/Bhosale/Circular